दुरध्वनी क्र. :०२२-२२८२ ०३११

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
मोती महल, ६ वा मजला, १९५, जे. टाटा मार्ग,
सी.सी.आय. क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

E-mail-
adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

---

जा.क्र. अपोमसं (वा)/४५/नियो/ मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग /वाहतुक अधिसुचना/३८८६/२०२३, मुंबई, दि. 08 NOV 2023

## "वाहतुक अधिसुचना"

ज्याअर्थी, यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रतगती मार्गावर मुंबई वाहिनीवर मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. तर्फे पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरीय रेल्वे कॉरीडोरचे काम कि.मी. ०७.५६० (चिखले ब्रिज) येथे दिनांक ०९/११/२०२३ रोजी ११.०० वा. ते १७.०० वा. च्या दरम्यान करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. तर्फे करण्यात येणा-या वरील नियोजीत कामाचेवेळी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मुंबई वाहिनीवर सर्व प्रकारची वाहने (हलकी व जड-अवजड वाहने) यांची वाहतूक बंद करण्यात येणार आहे. दरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये, वाहन चालकांची गैरसोय तथा वाहतूक सुरळीत व सुनिश्चीत रहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कुमार सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई याद्वारे शासन अधिसुचना क्र. एम.व्ही.ए. ०५८९/सीआर:१०६१/टीआर-२, दिनांक १९/०५/१९९०, Addendum, दिनांक ३०/०९/२०२२ नुसार मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कि.मी. ०७.५६० पुणे ते मुंबई वाहिनीवर (मुंबई कडे जाणारी वाहिनीवर) दिनांक ०९/११/२०२३ रोजी ११.०० वा. ते १३.१५ वा. व १४.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान सर्व प्रकारची वाहनांची (हलकी तसेच जड-अवजड वाहने) वाहतूक पुर्णतः बंद करणेबाबत तसेच जनतेला वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग वापरणेबाबत अधिसुचना जारी करीत आहे.

### पर्यायी मार्ग

१. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून पुणे बाजुकडून मुंबई बाजुकडे येणारी वाहने मुंबई लेन कि.मी. ९.६०० पनवेल एक्झीट वरून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या मार्गावर करंजाडे मार्गे कळबोली अशी वळविण्यात येतील.

२. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या मार्गावरून पुणे बाजुकडून मुंबई बाजुकडे येणारी वाहने शेडुंग फाटावरून बोर्ले टोल नाक्याकडे न येता सरळ पनवेल दिशेने मार्गस्थ करण्यात येतील.

कृपया मागे पहा.....

३. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून पुणे बाजुकडून मुंबई बाजुकडे येणारी **हलकी वाहने** मुंबई लेन कि.मी. ३९.८०० खोपोली एक्झीट वरून वळवुन मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या मार्गावरून मार्गस्थ करण्यात येतील.

सदरची वाहतूक अधिसुचना वर नमुद कालावधी दरम्यान मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. तर्फे करण्यात येणारे काम पुर्ण होईपर्यत अंमलात राहील.

( डॉ. रविंद्र कुमार सिंगल )
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे/पिंपरी चिंचवड/नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामिण/रायगड.
पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, पुणे/रायगड परिक्षेत्र.

प्रत :-

१. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
२. मुख्य कार्यकारी अभियंता (मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे.